REGISTERED No. B. 3434

# अर्थ


**अर्थ**

अर्थशास्त्र, व्यापार, उद्योगधंदे, बँकिंग, सहकार,
इत्यादि विषयांस वाहिलेलें साप्ताहिक.

**प्रत्येक बुधवारीं प्रसिद्ध होतें.**

*वर्गणीचे दर :*

**वार्षिक : ६ रु.** **सहामाही : ३ रु.**

**किरकोळ अंक : ४ आ.**

*जाहिरातीचे दर :*

कराराच्या व इतर अटी जाहिरातखात्याकडून मागवाव्यात.
चेक, मनिऑर्डरी, इ. पाठविण्याचा पत्ता:–
"अर्थ"
*"दुर्गाधिवास"* पुणें ४.


**वर्ष १५** **पुणें, बुधवार तारीख २३ मार्च, १९४९** **अंक १२**


उत्पादकांच्या सहकारी सोसायट्यांनीं तयार केलेला

## ग्रामोद्योगाचा माल खरेदी करा.

ह्या मालाची किंमत माफक असून, तो मजबूत व टिकाऊ आहे.

टोप्यांचें लायनिंग, चप्पल, कातडीं, हातमागावरील व पॉवरलूमवरील कापड, नक्षीदार व कलात्मक वस्तू, इत्यादींसाठीं चौकशी करा:—

## दि प्रॉव्हिन्शिअल इंडस्ट्रिअल को-ऑपरेटिव्ह असोसिएशन, लि.

**५, बँक हाऊस लेन, फोर्ट, मुंबई.**

तार : SAHYOG फोन : ३७५१९

**औद्योगिक सहकारावरील आमचीं प्रकाशनें**

(१) ऑर्गनायझेशन ऑफ इंडस्ट्रिअल कोऑपरेटिव्हज्
(ले.:—जे. बी. टेलर, किं. १ रु. ८ आ.)

(२) इंडस्ट्रिअल कोऑपरेशन
(ले.:—जे. बी. टेलर, किं. १ रु.)

(३) कोऑपरेटिव्ह मॅनेजमेंट
(ले.:—रेवि ॲले, किं. २ रु.)



## पुणें सेंट्रल कोऑपरेटिव्ह बँक लिमिटेड

स्थापना–१९१७

| फोन | तारेचा पत्ता | पोस्टबॉक्स |
|---|---|---|
| नं. २४८३ | "Cencobank" | नं. ५११ |

**मुख्य कचेरी:—लक्ष्मी रोड, पुणें शहर.**

शहर शाखा : डेक्कन जिमखाना, सर परशुराम-भाऊ कॉलेज, फर्ग्युसन कॉलेज, सेव्हिंग बँक सेक्शन.

—: शाखा :—

**जुन्नर, खेड, दौंड, इंदापूर, सासवड, घोडनदी, बारामती, निरा व मंचर**

—:बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात:—

जास्त माहितीसाठीं लिहा अगर समक्ष भेटा.

**द. दि. चितळे**
मॅनेजिंग डायरेक्टर








तयार कपड्यांचे व्यापारी **महिंद्रकर ब्रदर्स** बुधवार चौक, पुणें

## सर्व प्रसिद्ध माल

ऑफिस कटलरी, बागायतीचीं लहान मोठीं हत्यारें.
(एव्हर शार्प कंपनी, शोरानूरची कटलरी)

केळकर बंधू, बुधवार चौक, पुणें २ | केळकर बंधू, (शाखा) मेनरोड, नाशिक.

(आमचेकडे निरनिराळ्या एजन्सीज घेतल्या जातात व आमच्या सुमारें १०० वर उपविक्रेत्यांमार्फत मालाचा प्रसार केला जातो.)


## विविध माहिती

**पूर्वेकडील बाजारपेठेंत रशिया उतरणार?**—सध्या हिंद आणि रशिया ह्यांच्यांत व्यापारी तहाचीं बोलणीं चालूं आहेत. ह्या वाटाघाटींत रशिआने हिंदुस्थानला मोटारी, ट्रक्स आणि यांत्रिक नांगर देऊं केले आहेत असें समजतें. ह्या वर्षी पूर्वेकडील बाजारपेठेंतून विक्रीसाठीं रशिआ ५ लाख मोटारी व ७५ हजार ट्रक्स पाठवील अशी वार्ता आहे. ब्रिटिश मोटार कारखानदारांना रशिआच्या स्पर्धेची भीति वाटूं लागली आहे.

**साखरेवरील विक्रीकर**—साखरेवरील विक्रीकराचा मुंबई सरकारनें फेरविचार करावा अशी विनंति बाँबे शुगर मर्चंटस असोसिएशननें केली आहे. साखर ही लोकांच्या रोजच्या गरजेची वस्तू असल्यामुळें तीवर कर बसविल्यास तो ग्राहकांच्या दृष्टीनें वाईट परिणाम करणारा होईल; त्याचप्रमाणें रहाणीचा खर्च खालीं आणण्याच्या दृष्टीनेंही हा कर योग्य नाहीं, असा इशारा असोसिएशननें दिला आहे.

**सीलोनमध्यें उसाचे मळे**—सीलोनच्या पूर्वेकडील जंगलांचा भाग साफ करून लागवडीखाली आणण्यासाठी १,२०,००,००० पौंडांची एक योजना हातीं घेण्यांत आली आहे. ही योजना पुरी झाल्यावर पूर्वी ज्या ठिकाणीं जंगल होतें तेथें भाताची शेती आणि उसाचे मळे आढळून येतील. ही योजना ५ वर्षांत पुरी होईल आणि तीमुळें १०,००० एकर जमिनींत प्रथमच लागवड केली जाईल.

**निर्वासितांना सरकारी कर्जें**—निर्वासितांची उद्योगधंद्यांत आणि व्यापारांत सोय लावण्यासाठी मध्यवर्ती सरकारच्या ह्या संबंधींच्या संस्थेतर्फे आतांपर्यंत १,०५,००,००० रुपयांचीं कर्जें देण्यांत आलीं आहेत. निर्वासितांकडून आलेल्या कर्जाच्या अर्जांचा विचार संस्थेच्या डायरेक्टर्सतर्फे करण्यांत येऊन त्यांची विल्हेवाट लावण्यांत येते. निर्वासितांकडून आलेल्या अर्जांपैकीं ७४२ अर्ज मंजूर करण्यांत आले आहेत. दर अर्जामागे दिलेल्या कर्जाची सरासरी १४,००० रुपये पडते. एकाच व्यक्तीला जास्तींत जास्त १,०० ००० रुपयांचें कर्ज देण्यांत आलेलें आहे.

**इंग्लिश बनावटीचे यांत्रिक नांगर**—इंग्लंडमधील हॅरी फर्ग्युसन लि. कंपनीचे प्रतिनिधी मि. हीथ ह्यांनीं वृत्तपत्र-प्रतिनिधींना मुंबई येथें एक मुलाखत दिली. ही कंपनी यांत्रिक नांगर तयार करण्यांत निष्णात आहे. त्यांच्या मतानें मि. हॅरी फर्ग्युसन ह्या आयरिश गृहस्थानें यांत्रिक नांगरटीची जी पद्धत काढली आहे, ती हिंदुस्थानला चांगली उपयोगी पडण्यासारखी आहे. हिंदुस्थानला येत्या दहा वर्षांत दर वर्षी १ लाख यांत्रिक नांगर लागतील, असा त्यांचा अंदाज आहे. ह्या कंपनीच्या शेतीच्या अवजारांचें प्रात्यक्षिक दिल्लीला एप्रिलअखेर भरविण्यांत येणार आहे. जरूर तर हिंदुस्थानांतहि यांत्रिक नांगरांचा कारखाना काढण्यास कंपनी तयार होईल, असें समजतें.

**अमेरिकेचा निर्यात व्यापार**—अमेरिकेची गेल्या सालामधील निर्यात ३,१५,३५,००,००० पौंड किंमतीची झाली. ही निर्यात १९४७ सालांत झालेल्या निर्यातीपेक्षां १८ टक्क्यांनीं कमी आहे. १९४७ सालापेक्षां आयात २३ टक्क्यांनीं अधिक आहे. निर्यातीमधील घट इतर देशांत पडलेल्या डॉलर्सच्या तुटवड्यामुळें आणि अमेरिकेंतील लोखंड-पोलादाच्या तुटवड्यामुळें झाली असावी.

**कलकत्त्याला भूमिगत रेल्वे**—कलकत्ता शहरासाठी भूमिगत विजेची आगगाडी चालू करण्याच्या योजनेची तपासणी करण्यासाठी पश्चिम बंगाल सरकारनें एक कमिशन नेमलें आहे. ह्या कमिशनमध्यें फ्रेंच एंजिनिअर्स असून ते आपलें काम १ मे पासून सुरू करतील. रेल्वे किती खोलीवर बांधावी आणि त्यासाठी खर्च काय येईल, ह्यासंबंधीं कमिशन अहवाल सादर करणार आहे.

**हैद्राबाद संस्थानांत सोनें**—हैद्राबाद संस्थानांतील रायचूर जिल्ह्यांत लवकरच एक सोन्याची खाण चालू करण्यांत येणार आहे. ह्या खाणीसाठी ५० लाख रुपयांची यंत्रसामुग्री बसविण्यांत आली आहे. खाणींत रोज ८०० औंस सोनें निघूं शकेल असा अंदाज आहे. हा अंदाज खरा ठरला तर हैद्राबाद संस्थानांत कोलार येथील खाणींतून निघणाऱ्या सोन्याच्या खालोखाल सोनें येथें निघूं लागेल. हैद्राबाद सरकारनें खाण चालविण्यासाठी १ कोटी रुपये भांडवलाची कंपनी काढण्यास प्रोत्साहन दिलें आहे.

**तुंगभद्रा नदीवरील धरण**—तुंगभद्रेवरील धरणाचा मद्रास प्रांतांतील भाग १९५३ सालीं पुरा होईल अशी अपेक्षा व्यक्त करण्यांत आली आहे. हैद्राबाद संस्थान विरुद्ध पोलिसी मोहीम करण्यांत आली त्यावेळीं संस्थानमधील धरणाच्या कामांत थोडा खंड पडला होता. धरणाचा पाया घालण्याचें काम ९० टक्के होत आलें असून कालवे काढण्याचें खोदाईचें कामही संपत आलें आहे. कालव्याची लांबी २१० मैलांची होईल, आणि त्याच्या पाण्यामुळें बेल्लारी आणि कुर्नूल जिल्ह्यांतील बराच मोठा भाग पाण्याखालीं येईल. धरणासाठी मद्रास सरकारला १७ कोटी रुपये खर्च येईल.

**अमेरिकेंतील परकीय विद्यार्थी**—अमेरिकेंतील निरनिराळ्या विद्यापीठांतून आणि कॉलेजांतून परकीय देशांतील जवळ जवळ २१,००० हजार स्त्रीपुरुष विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. ह्या संख्येपैकीं सुमारें ५,००० विद्यार्थी हिंदुस्थान, चीन आफ्रिकेतून आशियामधील देशांतून गेलेले आहेत. युद्धपूर्व कालापेक्षां ही परकीय विद्यार्थ्यांची संख्या तिपटीनें अधिक आहे. उलटपक्षीं ११,००० अमेरिकन विद्यार्थी इतर देशांतील शाळांतून व कॉलेजांतून शिकत आहेत.


## ★ पूना कमर्शिअल हायस्कूल ★

व्यापारी विषय शिकविणारें पुण्यांतील पहिलेंच हायस्कूल, देशी व इंग्रजी पद्धतीचा जमाखर्च, शॉर्टहँड टाईपरायटिंग, व्यापारोपयोगी माहिती, पत्रव्यवहार असे उपयुक्त विषय. इं. ३ री व ४ थी पास झालेल्यांस अनुक्रमें ४ थी व ५ वी मध्यें प्रवेश. हुषार व गरीब विद्यार्थ्यांस सवलती. विशेष माहिती समक्ष. नवीन वर्ग १ मार्च पासून सुरू झाले आहेत.

डेक्कन इन्स्टि. ऑफ कॉमर्स बिल्डिंग, ५९४ बुधवार पेठ, जिजामाता बागेचा कोपरा, पुणें २.

कु. म. रानडे, बी. ए., बी. कॉम. मुख्याध्यापक.

# अर्थ

बुधवार, ता. २३ मार्च १९४९





संस्थापक : प्रो. वामन गोविंद काळे

संपादक : श्रीपाद वामन काळे


" अर्थ एव प्रधानः" इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति । —कौटिलीय अर्थशास्त्र

## परराष्ट्रीय व्यापारांतील प्रतिकूल तफावत

मध्यवर्ती सरकारचें अंदाजपत्रक सादर करतांना अर्थमंत्री डॉ. जॉन मथाई यांनीं हिंदच्या परराष्ट्रीय व्यापाराच्या परिस्थितीचा आढावा घेतला. त्याचप्रमाणें,गेल्या आठवड्यांत हिंदी पार्लमेंटमध्यें व्यापारमंत्री श्री. नियोगी यांनीं परराष्ट्रीय व्यापाराबद्दल विस्तृत भाषण केलें. हिंदच्या परराष्ट्रीय व्यापारांत प्रतिकूल तफावत येत आहे व चालू वर्षीं ही तफावत कित्येक कोटींपर्यंत जाईल ही विशेष चिंतनीय गोष्ट आहे. ही परिस्थिति त्वरित बदलली जाणें आपल्या देशाच्या अर्थ–व्यवहारांच्या दृष्टीनें इष्ट आहे.

गेल्या दोन–तीन वर्षांतील अन्नधान्याची आयात हें एक व्यापारांतील प्रतिकूल तफावतीचें मुख्य कारण आहे. नुकतीच सरकारनें दोन वर्षांत अन्न–धान्याची निर्मिती निश्चितपणें वाढविण्याची एक योजना, प्रांतिक सरकारांशीं विचारविनिमय करून आखली आहे. या योजनेप्रमाणें प्रांतांनी धान्योत्पादन वाढविल्यास व शेतकऱ्यांपासून धान्याची वसुली यशस्वीपणें केल्यास, कदाचित धान्याची आयात करावी लागणार नाहीं किंवा अगदी अल्प प्रमाणांत तरी करावी लागेल व त्यामुळें परराष्ट्रीय व्यापारांत येणारी प्रतिकूल तूट भरून निघण्यास मदत होईल.

परराष्ट्रीय व्यापाराचा विचार करतांना, स्टर्लिंग कर्जांतून मुक्त होणाऱ्या रकमेचा कशा प्रकारें उपयोग केला जातो या गोष्टीला विशेष महत्त्व आहे. १९५१ च्या जून अखेर मुक्त होणारी रक्कम यंत्रसामुग्री किंवा भांडवली माल याच्या खरेदीवरच खर्ची पडण्यांत हिंदचा खरा फायदा आहे. परंतु सध्यां ही रक्कम आयातीचे परवाने विशेष सैल केल्यामुळें, चैनीच्या किंवा किरकोळ उपयुक्ततेच्या वस्तू यांच्यावरच जास्त प्रमाणांत खर्ची पडत असावी. आयाती वरील निर्बंध सैल करण्याचा हा एक परिणाम आहे. तरीपण शक्य झाल्यास सरकारनें निरनिराळ्या प्रकारच्या मालाची खरेदी परदेशांतून कसकशी केली जाते या गोष्टीकडे बारकाईनें लक्ष पुरविल्यास सध्यांची परिस्थिति थोडीफार सुधारूं शकेल, व भांडवली मालाच्या खरेदीवरच जास्त पैसा खर्चितां येईल.

आयातीवरील निर्बंध सौम्य करणें हें, चलनविस्तारामुळें निर्माण झालेल्या महागाईवरील उपाययोजना या दृष्टीनें, योग्य असलें तरी याहि प्रश्नाची दुसरी बाजू आहे; व ह्या बाजूचा प्रतिध्वनि नुकत्याच दिल्ली येथें भरलेल्या व्यापारी संघटनांच्या परिषदेंत उमटला. त्याचप्रमाणें, निर्गत व्यापारी संघाच्या बैठकींतहि ह्या धोरणाबद्दल असमाधान दिसून आलेलें आहे. या प्रश्नाची ही दुसरी बाजू अशी आहे कीं, परदेशी मालाची अनिर्बंध आयात ही देशी मालाच्या उत्पादनावर व कारखानदारांच्या परिस्थितीवर कांहीं वेळां प्रतिकूल परिणाम करते. तेव्हां कारखानदारांची मागणी अशी कीं, देशांत जो माल मुळींच तयार होत नाहीं, किंवा ज्या मालाचें उत्पादन अपुरें होतें अशाच मालाच्या आयातीवर निर्बंध नसावा. एकंदर निर्गत व्यापाराची परिस्थिति, देशांतील अंतर्गत उत्पादनाची परिस्थिति व आयातीचें धोरण ह्या तीनहि गोष्टींचा बारकाईनें विचार करून सरकारनें परराष्ट्रीय व्यापाराचें धोरण ठरविणें आवश्यक आहे. सरकारचें ह्या त्रिविध परिस्थितीकडे लक्ष आहेच. परंतु यापुढें परराष्ट्रीय व्यापाराची परिस्थिति निदान आपणाला व्यापाराची तोंड-मिळवणी तरी करतां येईल या दृष्टीनें सुधारणें आवश्यक आहे. आयात सल्लागारमंडळ, निर्गत सल्लागारमंडळ, हिंद सरकारचें व्यापारी खातें व अर्थ खातें या सर्वांच्या प्रभावी सहकार्यानेंच हा प्रश्न समाधानकारक रीतीनें सुटूं शकेल.

## रबराच्या उत्पादनांत हिंदुस्थानाचें स्थान

रबराचें जागतिक उत्पादन १९०१ सालीं ५३,८८७ टन झालें. १९१३ सालीं तें १,०८,१७२ टन झालें. १९१८ सालीं तें ३,८०,००० टन भरलें व १९२९ मध्यें तें ८,६३,००० टनांवर गेलें. १९३५ मधील उत्पादनाचा आकडा ११,६०,००० टन होता, तर १९४० सालांतील उत्पादनाचा आकडा १३,८९,६९५ टनांपर्यंत पोचला. रबराच्या उत्पादकांत मलाया, ने. ईस्ट इंडीज, सिलोन, फ्रेंच इंडो–चायना, थायलँड, सारावाक, इत्यादि देश अत्यंत महत्त्वाचे आहेत. हिंदुस्थानचा अनुक्रम ९ वा लागतो. आपल्या देशांत सुमारें १,५८,३२२ एकरांत रबराची लागवड झालेली असून उत्पादन १६,५०० टन होतें. सुमारें ४७,००० मजूर रबराच्या मळ्यांत काम करीत असतात. ह्या धंद्यांत १६ कोटी रु. भांडवल गुंतलेलें आहे. बहुतेक मळे त्रावणकोर संस्थानी हद्दींत आहेत.

रबराच्या मळ्यांची सुस्थिति टायर्सच्या धंद्याच्या प्रगतीवर अवलंबून असते. जागतिक उत्पादनाच्या ७०% रबराच्या टायर्स बनविल्या जातात. हिंदुस्थानांतील टायर्सच्या कारखान्यांत हिंदी रबराच्या उत्पादनाच्या ८० ते ९०% रबर खपतें. हिंदुस्थानांत रबरी धांवांचा खप वाढणार असल्याकारणानें, रबराच्या मळ्यांसहि सुस्थिति रहाण्याचा संभव आहे. रबराच्या उत्पादनाचे देशवार आंकडे खालीं दिले आहेतः—

उत्पादनाचे तुलनात्मक आकडे

| देश | १९४० मधील उत्पादन ( टन ) |
|---|---|
| मलाया | ५,४०,४१७ |
| ने. ई. इंडीज | ५,३६,७४० |
| सिलोन | ८८,८९४ |
| फ्रेंच इंडो–चायना | ६४,४३७ |
| थायलँड | ४३,९४० |
| सारावाक | ३५,१६६ |
| नॉर्थ बोर्निओ | १६,६२६ |
| द. अमेरिका | १७,६०१ |
| हिंदुस्थान | ११,५१० |
| ब्रह्मदेश | ९,६६८ |
| इतर | २३,६९९ |
| एकूण | १३,८९,६९५ |

## अटलँटिक करार

### लष्करी संरक्षणासाठी प्रभावी संघटना

ग्रेट ब्रिटन, अमेरिका, फ्रान्स, बेल्जम, कॅनडा, लक्सेंबर्ग व हॉलंड ह्या सात राष्ट्रांनीं २० वर्षांच्या मुदतीचा स्वसंरक्षणासाठीं करार करण्याचें ठरविलें आहे, आणि आणखी पांच राष्ट्रांना (नॉर्वे, डेन्मार्क, आइसलंड, पोर्तुगॉल व इटली) आपल्या गटांत येण्याचें आमंत्रण दिलें आहे. ह्या करारावर वॉशिंग्टन येथें ता. ४ एप्रिल रोजीं सह्या होतील. आठ महिन्यांच्या दीर्घ वाटाघाटीचें हें फळ आहे. कराराचा मसुदा गटांतील सातहि राष्ट्रांच्या राजधान्यांत एकाच वेळीं, ता. १८ रोजीं, जाहीर करण्यांत आला. कराराच्या इंग्रजी व फ्रेंच प्रती ह्या दोन्ही अधिकृत मानल्या जातील. संयुक्त राष्ट्रसंघटनेच्या उद्दिष्टास व तत्त्वास प्रथम वंदन करूनच कराराचीं कलमें लिहिण्यांत आलीं आहेत. उत्तर अॅटलँटिक महासागराच्या भोंवतालच्या प्रदेशांत स्थिरता व सुखसमाधान नांदावें असा कराराचा हेतु आहे. त्यासाठीं आंतरराष्ट्रीय आर्थिक धोरणांतील विरोध नष्ट करून, गटांतील राष्ट्रें एकमेकांचे आर्थिक संबंध दृढतर करणार आहेत. गटांतील कोणावरहि लष्करी आक्रमण झाल्यास तें सर्वच भाऊबंदांवर आक्रमण आहे, असें समजलें जाईल व जरूरीप्रमाणें बचावासाठीं लष्करी योजना केली जाईल. तिची माहिती सुरक्षा समितीस देण्यांत येईल. करारबद्ध राष्ट्रांचें एक कौन्सिल तात्काळ स्थापन केलें जाऊन तें कौन्सिल तांतडीनें संरक्षण समितीची नेमणूक करील. अशा रीतीनें ७० लक्ष चौरस मैल क्षेत्राचा व २५ कोटी लोकसंख्येचा प्रदेश लष्करीदृष्ट्या एकसंघी बनेल. लष्करी तयारीत वाढ करण्यास आतां लागलीच प्रारंभ होईल, हें उघड आहे.

प्रस्तुत करार हा उद्देशाचा केवळ जाहीरनामा आहे आणि उद्देश यशस्वी करण्यासाठीं लष्करी तयारी मोठ्या प्रमाणावर ठेवणें स्वाभाविकच अगत्याचें ठरतें. संभाव्य आक्रमणास तोंड देण्याची योजना लष्करी तज्ज्ञांनीं अगोदरच तयार ठेवली असेल. अटलांटिक करारास उत्तर म्हणून रशियाहि पूर्व युरोपची प्रभावी संघटना अधिक उघडपणें करूं लागण्याचा संभव आहे. जगांतील राष्ट्रांचे दोन परस्परविरोधी तट आतां पडून संयुक्त राष्ट्रांच्या अखंड जगाच्या कल्पनेस मूठमाती मिळणार, असें मत मि. हेन्री वॅलेस ह्यांनीं व्यक्त केलें आहे.

### वृत्तपत्रांतील जाहिरातींवरील कर

१ एप्रिल, १९४९ पासून मुंबई सरकार वृत्तपत्रांतील जाहिरातींच्या बिलांवर रुपयास एक आणा ह्याप्रमाणें कर बसविणार आहे. प्रत्येक महिन्याच्या १० तारखेपूर्वी आधीच्या महिन्याचें रिटर्न वृत्तपत्रांच्या मॅनेजरांनीं पाठवावयाचें आहे. हें रिटर्न तपासून कराची आकारणी केली जाईल व मॅनेजरला त्याची नोटीस दिली जाईल. तेव्हांपासून १० दिवसांचे आंत कर भरला पाहिजे. कांहीं विशिष्ट जाहिरातींस कराची माफी देण्याचा अधिकार सरकारनें राखून ठेवला आहे. सरकारी अधिकाऱ्यांस मिळलेली माहिती गुप्त राखली जाईल. तपशीलवार नियम सरकार पुढें करील.

### पुणें घरभाडेकरूंची परिषद

पुणें घरभाडेकरूंच्या ५ व्या अधिवेशनाचें अध्यक्षस्थान स्वीकारणेचें सुप्रसिद्ध मजूर पुढारी श्री. ना. म. जोशी यांनीं कबूल केलें आहे. सदर अधिवेशन ता. २७-३-४९ रोजीं रविवारीं भरणार आहे. प्रतिनिधी फी १ रुपया आहे ज्यांना याबाबत ठराव, सूचना वगैरे द्यावयाच्या असतील, त्यांनीं त्या श्री. श्री. वि. गाडगीळ, अध्यक्ष, 'पुणें घरभाडेकरू संघ, ७२० सदाशिव पेठ, पुणें ह्या पत्त्यावर धाव्या.

## इंडस्ट्रिअल फिनॅन्स कॉर्पोरेशन

### प्रत्येक कर्जाची सरासरी १९ लक्ष रुपये

हिंदी उद्योगधंद्यांस मध्यम व दीर्घ मुदतीचें भांडवल पुरविण्यासाठीं ही कॉर्पोरेशन १ जुलै, १९४८ रोजीं स्थापन झाली. तिचें अधिकृत भांडवल १० कोटी रु. आहे. त्यापैकीं निम्में विक्रीस काढण्यांत आलें. मध्यवर्ती सरकार व रिझर्व्ह बँक ह्यांनीं प्रत्येकीं १ कोटी रुपये घातले आहेत. विमा कंपन्या, इन्व्हेस्टमेंट ट्रस्ट्स, बँका इत्यादींनीं बाकीचें भांडवल पुरविलें आहे. बारा जणांचें डायरेक्टर बोर्ड कॉर्पोरेशनची व्यवस्था पहातें. त्यापैकीं मॅनेजिंग डायरेक्टर व तीन डायरेक्टर सरकारनें नियुक्त केलेले आहेत. दोन डायरेक्टरांची नेमणूक रिझर्व्ह बँकेच्या सेंट्रल बोर्डानें केली आहे आणि बाकीचे सहा डायरेक्टर इतर भागीदारांचे प्रतिनिधी आहेत. पब्लिक लिमिटेड कंपन्या व सहकारी सोसायट्या ह्यांनाच फक्त कॉर्पोरेशनकडून कर्ज मिळूं शकतें. कॉर्पोरेशननें आतांपर्यंत एकूण १ कोटी, ८४ लक्ष रुपयांचीं कर्जें मंजूर केलेलीं आहेत. मशिनरीचें उत्पादन, इलेक्ट्रिकल इंजिनिअरिंग, सिमेंट, लोखंड-पोलादाच्या फाउंड्रया, काच कारखाने, विद्युत्पुरवठा, केमिकल कारखाने, इत्यादींस कॉर्पोरेशनकडून सहाय मिळालेलें आहे.

वरील माहिती मध्यवर्ती फडणिशी खात्याच्या ताज्या रिपोर्टांत आढळते. परंतु, अर्थमंत्र्यांनीं पार्लमेंटांत दिलेल्या अगदीं ताज्या माहितीप्रमाणें, एकूण २ कोटी, २५ लक्ष रुपयांचीं १२ कर्जें मंजूर झालेलीं आहेत. ह्या बारांपैकीं सहा कर्जें जुन्या कारखान्यांना असून सहा कर्जें नव्या कारखान्यांना आहेत. कॉर्पोरेशनच्या व्यवहारांत सहकारी सोसायट्यांनीं लक्ष घातलेलें दिसत नाहीं; कारण आतांपर्यंत कॉर्पोरेशनकडे फक्त एकाच सोसायटीचा अर्ज दाखल झाला आहे.


# दि बँक ऑफ महाराष्ट्र लि.

**—शेड्यूल्ड बँक—**

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल.... ... | .... रु. ५०,००,००० |
| विक्रीस काढलेलें व खपलेलें भांडवल | रु. ३२,००,००० |
| वसूल झालेलें भांडवल .... | .... रु. १६,००,००० |
| रिझर्व्ह व इतर फंड.... .... | .... रु. ४,३०,००० |
| एकूण खेळतें भांडवल .... | ... रु. २ कोटीचे वर |

**बोर्ड ऑफ डायरेक्टर्स.**

श्री. धों. कृ. साठे (चेअरमन), श्री. श्री. गो. मराठे, (व्हाईस चेअरमन)
श्री. न. ग. पवार, श्री. फ. दो. पदमजी,
श्री. मा. रा. जोशी, श्री. शं. ल. किर्लोस्कर,
श्री. मा. वि. शहा, श्री. मो. रा. ढमढेरे.
श्री. भा. म. गुप्ते,

**गेल्या वर्षासाठी बँकेनें ५ टक्के करमाफ डिव्हिडंड जाहीर केलें.**

सर्व प्रकारचे बँकेचे व्यवहार केले जातात.

मुख्य कचेरी : लक्ष्मी रोड, पुणें २. | सी. व्ही. जोग, मॅनेजर.

(पॅरमाउंट लि.)

### दि त्रावणकोर ओगले ग्लास फॅन्युफॅक्चरिंग कं. लि., मंजुमेल
( वार्षिक सभा: २५–३–४९ )

वरील कंपनीनें १९४८ सालीं सुमारें ४,५०,००० रुपये किंमतीच्या मालाचें उत्पादन केलें. १९४७ मधील उत्पादनाची किंमत ४,७०,००० रु. होती. ह्याचा अर्थ, उत्पादन कमी झालें असा मात्र नाहीं. उलट, तें ३५% वाढलें आहे. मालाच्या उतरत्या किंमतीमुळें, प्रत्यक्ष माल जास्त निघूनहि त्याची किंमत कमी भरली आहे. सबंद १९४८ सालांत उत्पादनाचा खर्च भारी राहिला परंतु अत्यंत मोठ्या प्रमाणावरील परदेशी आयातीमुळें काच मालाच्या किंमती मात्र उतरल्या. काचेच्या हिंदी कारखानदारांनीं टारिफ बोर्डाकडे संरक्षणाची मागणी केली आहे, तिचा विचार चालू आहे. शीट ग्लास युनिटची योजना पुरी पडण्यासाठी कंपनीची त्रावणकोर सरकारशी भांडवलासाठी बोलणीं चालू आहेत. अहवालाचे वर्षी कंपनीस ३,११६ रु. निव्वळ नफा उरला त्यांत मागील शिल्लक नफा मिळविला म्हणजे २०,९९७ रु. होतात. त्यांतून १९४८ सालचा २०,००० रु. घसारा काढला म्हणजे उरलेला ९९७ रु. नफा पुढील हिशेबांत ओढण्यांत येईल.

---

### बँक ऑफ पूना लि.
( वार्षिक सभा : २६–३–४९ )

वरील शेड्यूल्ड बँकेची स्थापना १९ जुलै, १९४५ रोजीं झाली. ३१ डिसेंबर, १९४८ अखेरचा तिचा अहवाल हा तिसरा वार्षिक अहवाल आहे. बँकेचें खपलेलें भांडवल २५ लक्ष रु. असून वसूल भांडवल १२½ लक्ष रु. आहे. एकूण ताळेबंद ३१¾ लक्ष रुपयांचा आहे. अहवालाचे वर्षी बँकेस १७,२१० रु. निव्वळ नफा झाला, त्यांपैकीं १५,२२९ रुपयांचा विनियोग गेल्या वर्षीच्या हिशेबांतील जिंदगी बाजूच्या नफा–तोटा खात्याची बाकी काढून टाकण्याकडे केल्यावर १९८१ रु. उरतात. रिझर्व्ह फंड, ब्रोकरेज, प्राथमिक खर्च, इत्यादींकडे त्याची वाटणी करून ७१ रु. पुढील वर्षाचे हिशेबांत ओढण्यांत येणार आहेत. बँकेच्या ठेवींत अहवालाचे वर्षी मोठी भर पडली असून तिच्या व्यवहारांत वाढ होत आहे. तिच्या सर्व शाखा स्वावलंबी आहेत, ही गोष्ट महत्त्वाची आहे; कारण इतर कित्येक बँकांना आपल्या शाखांच्या प्रारंभींच्या नुकसानकारक व्यवहाराचें ओझें कित्येक वर्षे वहावें लागलें व लागत आहे. बँकेची मुख्य कचेरी ४५५, रविवार पेठ येथें असून तिच्या १२ भवानी पेठ पुणें; ३६१ सदाशिव पेठ, पुणें; टिळक चौक, सोलापूर व वखार भाग सांगली, अशा चार शाखा आहेत. शेठ मुरलीधर चतुर्भुज लोया हे बँकेचे चेअरमन आहेत व शेठ द. रा. नाईक, जे. पी. हे व्हाइस चेअरमन आहेत. श्री. गो. गं. साठे, ए. बी. आय. ( लंडन ) हे मॅनेजर आहेत.

---

**पश्चिम जर्मनीमधील बेकार**—अमेरिका आणि ब्रिटन ह्यांनीं व्यापलेल्या जर्मनींतील विभागांत मिळून १० लाखांपेक्षां अधिक लोक बेकार आहेत अशी अधिकृत माहिती आहे. १ जानेवारी, १९४९ पासून फेब्रुआरी महिन्याच्या मध्यापर्यंत बेकारांची संख्या ७७,००० नीं वाढली.

**रब्बी पिकाच्या किंमती**—१९४९–५० मधील रब्बीच्या पिकाच्या किंमती ठरविण्यासाठी मध्यवर्ती, प्रांतिक व संस्थानी सरकारें, ह्यांची एक परिषद दिल्ली येथें ता. २४ मार्च रोजीं भरणार आहे असें समजतें.

### भोर स्टेट बँक लि., भोर
( वार्षिक सभा : २७–३–४९ )

वरील बँकेस तिच्या व्यवहारांत १९४८ सालीं ५,०४७ रु. नफा झाला. गेल्या वर्षाची पुढें ओढलेली रक्कम त्यांत मिळविली म्हणजे नफा-वाटणीस ८,६२५ रु. येतात. त्यांतून १,५०० रु. रिझर्व्ह फंडांत जमा करून ४% डिव्हिडंडसाठीं ६,९७१ रुपयांचा विनियोग करण्यांत यावयाचा आहे. म. गांधी राष्ट्रीय स्मारक फंडास १०१ रु. देण्यांत येतील. अहवालाचे वर्षी बँकेचें उरलेलें २½ लक्ष रुपयांचें भांडवल एकूण २५,००० रु. प्रीमियमनें खपलें. ही वाढाव्याची रक्कम रिझर्व्ह फंडाकडे घेण्यांत आली. बँकेची शाखा ५१५, बुधवार पेठ, पुणें येथें ता. २९–१–१९४८ रोजीं उघडण्यांत आली, तिचें काम समाधानकारक चाललें आहे. कर्जरोख्यांच्या विक्रीमधील नफ्यावरील इनकम टॅक्स व उतरलेल्या किंमतीनें विकलेले कर्जरोखे ह्यांचा खुलासा डायरेक्टरांचे रिपोर्टांत करण्यांत आला आहे. बँकेच्या सुरवातीपासून मार्गदर्शन करणारे बँकेचे उपाध्यक्ष श्री. वा. पुं. वर्दे ह्यांनीं बँकेच्या प्रगतीस केलेल्या बहुमोल मदतीचा उल्लेख डायरेक्टरांनीं केला आहे. त्यांच्या जागीं श्री. म. व्यं. शिंगरे ह्यांची निवड झाली आहे. बँकेची वार्षिक सभा पुणें येथील कचेरींत भरणार आहे.

---

## ओगले ग्लास वर्क्स लि., ओगलेवाडी.
## नोटीस.

वरील कंपनीच्या भागीदारांची अठाविसावी वार्षिक साधारण सभा ओगलेवाडी येथील कंपनीच्या बिझिनेस ऑफिसमध्यें रविवार ता. १० एप्रिल १९४९ रोजीं दोन प्रहरीं ३ वाजतां खालील कामकाजांचा विचार करणेसाठी भरणार आहे.

( १ ) डायरेक्टर्स यांनीं केलेला रिपोर्ट व ता. ३१–१२–४८ अखेरचीं हिशोब तपासलेलीं ताळेबंद व नफातोटा पत्रकें स्वीकारून मंजूर करणें.
( २ ) डिव्हिडंड मंजूर करणें.
( ३ ) आर्टिकल्स ऑफ असोसिएशन कलम १०६ प्रमाणें श्री. पी. एन. आगटे, श्री. एन. व्ही. गोगटे व मेजर सरदार भाऊसाहेब पाटणकर हे बोर्ड ऑफ डायरेक्टर्सवरील आपल्या जागा पाळीप्रमाणें सोडीत असून त्यांचे जागीं तीन डायरेक्टर्सची निवड करावयाची आहे. जागा सोडणारे डायरेक्टर्स पुन्हां निवडून येण्यास पात्र असून ते त्या जागासाठीं उभे आहेत.
( ४ ) चालू सालासाठीं ऑडिटर्स नेमून त्यांचा तनखा ठरविणें.
( ५ ) सन १९४९ अखेर मे. एस. पी. ओगले आणि कंपनी यांची मॅनेजिंग एजन्सीची मुदत संपत असल्यानें ती पुढील २० वर्षे चालू ठेवणेबाबत विचार करणें.
( ६ ) याखेरीज ऐनवेळीं जीं कामें चेअरमन समपुढें मांडतील त्यांचा विचार करणें. कंपनीचीं शेअर ट्रान्स्फर बुकें ता. २६ मार्च ते १० एप्रिल १९४९ अखेर ( दोन्ही दिवस धरून ) बंद रहातील.

ओगलेवाडी, ( जि. सातारा )
ता. १३ फेब्रुवारी १९४९.

बोर्ड ऑफ डायरेक्टर्स यांचे हुकमावरून
एस. पी. ओगले आणि कंपनी
मॅनेजिंग एजंटस.

---

**सूचना:**—डिव्हिडंड देण्याचें वार्षिक सभेंत मंजूर झालेंच ज्यांचीं नांवे शेअर रजिस्टरवर ता. २५ मार्च १९४९ रोजीं दाखल असतील त्यांना ता. १ जून १९४९ पासून डिव्हिडंड रकमा मनीऑर्डर अगर इन्शुअरनें अनुक्रमानें पाठविण्यास सुरवात होईल. तरी आपल्या पत्त्यांत काहीं फेरबदल असल्यास कृपा करून तो ताबडतोब कळवावा.

श्री

# दी बृहन्महाराष्ट्र शुगर सिंडिकेट लिमिटेड, पुणें २.

युद्धोत्तरकालांत सिंडिकेटच्या सर्वांगीण वाढीच्या योजना आखल्या जात आहेत.

कंपनीनें ऑर्डिनरी शेअरवर १० टक्के डिव्हिडंड दिलें आहे.

सी. जी. आगाशे आणि कं.,
मॅनेजिंग एजंट्स.

दि प्रेसिडेन्सी इंडस्ट्रियल बँक लि.

( शिड्यूल्ड बँक )

प्रेसिडेन्सी बँक बिल्डिंग
पुणें २.

अधिकृत, विक्रीस काढलेलें व खपलेलें भांडवल रु. १०,००,०००
जमा झालेलें भांडवल रु. ७,१५,१६५
खेळतें भांडवल रु. ७१,००,०००

मुंबई शाखाः—कॉमनवेल्थ बिल्डिंग, ८२, मेडोज स्ट्रीट, मुंबई १

श्री. ग. रा. साठे, अध्यक्ष. श्री. दा. ग. बापट, उपाध्यक्ष.

बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.

श्री. गो. धों. जोगळेकर बी. ए. (ऑ.), बी. कॉम., एलएल. बी., मॅनेजर

श्री. सी. टी. चितळे मॅनेजिंग डायरेक्टर

## अज्ञानाच्या मालमत्तेची विक्री.

### कोर्ट ऑफ वॉर्डस् कायद्यांत दुरुस्ती

१९०५च्या बॉम्बे कोर्ट ऑफ वॉर्डस् ॲक्टमधील कलम २७मध्यें दुरुस्ती करण्याचें मुंबई सरकारनें ठरविलें आहे. सरकारच्या पालकत्वाखालीं असलेल्या अज्ञानाची मालमत्ता विकणें, तिची अदलाबदल करणें, गहाण टाकणें वगैरे बाबतच्या कोर्ट ऑफ वॉर्डसच्या अधिकारासंबंधीं हें कलम आहे. पोटकलम (ब) प्रमाणें सरकारच्या पालकत्वाखालील अज्ञानाची ½ स्थावर मालमत्ता विकली असेल किंवा तिची अदलाबदल केली असेल तर पुन्हा मालमत्तेची विक्री किंवा अदलाबदल करतां येत नाहीं. या कलमांत ½ मालमत्ता विकण्यासंबंधी किंवा तिची अदलाबदल करण्यासंबंधीं जी मर्यादा घालण्यांत आली आहे ती ¾ पर्यंत आणावी, कारण बहुतेक प्रकरणांत कर्जफेड करण्यासाठीं स्थावर मालमत्तेचा बराच भाग विकणें जरूर पडतें व तें अज्ञानाच्या व मालमत्तेच्या हिताचें असतें, असें सुचविण्यांत आलें आहे. हें उद्दिष्ट साधण्यासाठीं दुरुस्तीचें बिल तयार करण्यांत आलें आहे, तें मुंबई सरकारच्या ४ मार्च, १९४९ च्या गॅझेटमध्यें प्रसिद्ध झालें आहे.

## बँकिंग कंपन्यांबाबत नवा कायदा

### सहा महिन्यांसाठी कांहीं सवलती

बँकिंग कंपन्यांबाबत नवा कायदा १६ मार्च रोजीं अंमलांत आला. त्या कायद्याच्या कांहीं कलमांची अंमलबजावणी, रिझर्व्ह बँकेच्या सल्ल्यास अनुसरून, सहा महिने तहकूब ठेवण्याचें हिंदुस्थान सरकारनें ठरविलें आहे. त्यापैकी महत्त्वाच्या तहकुबी खालीलप्रमाणें आहेत. कोणत्याहि बँकेचा डायरेक्टर दुसऱ्या बँकेचा डायरेक्टर असता कामा नये, हा नियम सहा महिनेपर्यंत अंमलांत आला नाहीं तरी चालेल. दुसऱ्या कंपनीचा डायरेक्टर बँकेचा व्यवस्थापक किंवा नोकर होऊं शकत नाहीं, हा नियमहि सहा महिनेपर्यंत पाळला नाहीं तरी चालेल. त्याचप्रमाणें, दुसऱ्या एकाद्या व्यवसायांत गुंतलेला व्यवस्थापक अथवा नोकर ह्यानें सहा महिनेपर्यंत तो व्यवसाय चालू ठेवला, तरी तो बँकेंत काम करूं शकेल.

### "व्यापारी शिंपी"

शिवण व कर्तन कलेची चर्चा करणारें हें द्वैमासिक श्री. मो. ना. पाटसकर, एफ. सी. डी. (लंडन) ह्यांच्या संचालकत्वाखालीं सुरू झालें आहे. त्याचा पहिला अंक प्रसिद्ध झाला आहे. शिवणकर्तनाच्या व्यवसायास पूर्णपणें वाहिलेल्या ह्या नियतकालिकाचें आम्ही मनःपूर्वक अभिनंदन करतों व त्यास सुयश चिंतितों. व्यवसाय बंधूंना ज्ञानार्जन व्हावें, ह्या कलेची शास्त्रशुद्ध वाढ व्हावी, शिवणकामाच्या धंद्याची प्रतिष्ठा वाढावी, इत्यादि उद्देशानें "व्यापारी शिंपी" प्रयत्न करणार आहे. प्रस्तुत द्वैमासिकांत कोणत्या प्रकारचे विषय यावेत, त्यांची मोठी यादी त्यांनीं दिली आहे, तिचेवरून "व्यापारी शिंपी"चें कार्यक्षेत्र लक्षांत येतें. द्वैमासिकाचें रूपांतर मासिकांत लवकरच होवो व त्याची उपयुक्तता व्यावसायिकांस सत्वर पटो. मासिकाच्या सल्लागार समितींत श्री. एस. एच. काकडे, एफ. सी. डी. (लंडन) कोल्हापूर, श्री. एम. जी. पिसाळ, एफ. सी. डी. (लंडन) ग्वाल्हेर व श्री. व्ही आर. पराडकर एफ. सी. डी. (लंडन) पुणें हे आहेत. वरील गृहस्थांचा त्यासंबंधांतील अधिकार ह्या प्रांतांतील हितसंबंधी लोकांस माहीत आहेच. श्री. द. ब. भुस्कर हे संपादकाचें काम करणार आहेत. (वा. व. ३ रु. ४ आ. पत्ता: ६९२, शिवाजीनगर, पुणें ४)


## दि सांगली स्टेट सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँक लि., सांगली

(स्थापना सन १९२७)

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल | ५,००,००० रु. |
| खपलेलें भांडवल | १,७६,१०० रु. |
| भरलेलें भांडवल | १,०३,२५० रु. |
| रिझर्व्ह व इतर फंड | १,१७,००० रु. |
| खेळतें भांडवल | ११,००,००० रु. |

या बँकेंत मुदतीच्या, सेव्हिंग व करंट ठेवी स्वीकारल्या जातात. बँकेचे सभासदांना, सोसायट्यांना व व्यक्तिशः भागीदारांना योग्य तारणावर कर्जे दिलीं जातात. सोन्याचे तारणावर सवलतीचे व्याजाचे दरानें कर्ज दिलें जातें. वेस्टर्न इंडिया लाइफ इन्शुअरन्स कंपनी लि. सातारा व इंडिया इक्विटेबल इं. कं. लि. कलकत्ता, या कंपन्यांचे विम्यांचे हप्ते स्वीकारले जातात. चेक-हुंड्यांची खरेदी-विक्री, सरकारी कर्जरोखे व शेअर्स यांची खरेदी-विक्री व व्याज-वसुली वगैरे

सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार
या बँकेमार्फत केले जातात.

ना. पां. ठाणेदार
मॅनेजर



## दी भारत इंडस्ट्रिअल बँक लिमिटेड

हेड ऑफिस : पुणें शहर

शाखा:—पुणें लष्कर, बारामती, लोणावळा, श्रीरामपूर (बेलापूर रोड), ओझर (जि. नाशिक)
पे-ऑफिसः—खोपोली (जि. कुलाबा)

| | |
|---|---|
| श्री. के. वि. केळकर M. A., LL. B. (वकील) (अध्यक्ष) | श्री. बी. बी. वाळवेकर (उपाध्यक्ष) |

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. १५,४३,८१० |
| विक्री झालेलें भांडवल | रु. ७,९३,८१० |
| वसूल भांडवल | रु. ३,९८,९८५ |

एकूण खेळतें भांडवल ५३ लाखांचे वर

सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.

श्री. रा. बा. साळवेकर B. A., LL. B.
श्री. नी. ना. क्षीरसागर
मॅनेजिंग डायरेक्टर.

## भुइमुगाच्या पेंडीवरील नियंत्रण

**बॉंबे ग्राउंडनट ऑईल केक्स (रेग्युलेशन ऑफ ट्रेड ॲंड मुव्हमेंट) ऑर्डर, १९४९**

(अ) (१) ही ऑर्डर १५ फेब्रुवारी रोजीं अमलांत आली.

(२) "ग्राउंडनट ऑइलकेक्स" ह्याचा अर्थ भुइमुगाच्या शेंगा किंवा दाणे पॉवर मशिनरीमध्यें (एक्सपेलर्स, रोटरीज किंवा हैड्रॉलिक प्रेसेस) घालून बनविलेली पेंड.

(३) अशी पेंड बनविणारा म्हणजे 'मिलर'

(४) पेंडीच्या खरेदी-विक्रीचा धंदा करणारा ('मिलर' नव्हे) म्हणजे 'डीलर'.

((ब) ऑर्डरच्या २ ऱ्या शेड्यूलमधील नमुन्याप्रमाणें परमिट घेऊनच व त्यांतील अटीप्रमाणेंच. भुइमुगाच्या पेंडीची (त्यांत हातघाणीच्या पेंडीचाहि समावेश होतो) वहातुक करतां येईल. जेथून माल पाठविण्याचा, ती जागा मुंबई शहर किंवा उपनगर जिल्हा ह्यांत असेल, तर ॲग्रि. व रूरल डे. खात्याचे सेक्रेटरीचा परमिट पाहिजे. इतर जिल्ह्यांत तेथील कलेक्टर परमिट देतील. माल पाठविल्याबरोबर किंवा परमिटची मुदत संपताच (जी वेळ आधीं असेल त्या वेळीं) माल पाठविणारानें परमिट ज्याचेकडून घेतला असेल त्यास परत केला पाहिजे.

(क) ऑर्डरच्या ३ ऱ्या शेड्यूलमधील नमुन्याप्रमाणें लायसेन्स घेतल्याखेरिज कोणत्याहि मिलरनें १ मार्च, १९४९ नंतर पेंड तयार करण्याचा धंदा करतां कामा नये.

(ड) कोणाहि डीलरला ऑर्डरच्या ४ थ्या शेड्यूलमधील नमुन्याप्रमाणें लायसेन्स घेतल्याखेरीज १ मार्च, १९४९ नंतर भुइमुगाच्या पेंडीच्या खरेदी–विक्रीचा धंदा करतां येणार नाहीं.

(इ) कोणत्याहि व्यापाऱ्यास किंवा मिलरला प्रांतिक सरकार सूचना देऊन, अमक्याला अमुक पेंड, अमुक मुदतींत व अमुक किंमतीला वीक, असें सांगतां येईल. त्याप्रमाणें, मिलरनें व व्यापाऱ्यानें पेंड विकलीच पाहिजे. तसें न केलें, तर सरकारी अधिकारी अशा पेंडीचा ताबा घेऊं शकतील.

(फ) चौकशी, तपासणी, इत्यादींचे अधिकार सरकारास आहेत.

### साठ्याचा साप्ताहिक तपशील

पॉवर मशिनरीवर चालणाऱ्या प्रत्येक ऑईल मिलच्या व्यवस्थापकानें २१ फेब्रुवारी, १९४९ पासून पुढें प्रत्येक सोमवारीं ॲग्रि. व रूरल डे. खात्याच्या सेक्रेटरीस, नमुन्याप्रमाणें, पूर्वीच्या शनिवारच्या आपल्या जवळील पेंडीच्या साठ्याचा तपशील कळविला पाहिजे. ह्या हुकुमाची अंमलबजावणी होते किंवा नाहीं, हें पाहण्यासाठीं चौकशी तपासणी-जप्तीचे अधिकार सरकारी अधिकाऱ्यांस देण्यांत आले आहेत.

नमुना

शनिवार ता.······१९४ रोजींचा भुइमुगाच्या पेंडीचा सांठा

मिलचें नांव··············· पत्ता······ ·····

माल

(१) पूर्वीच्या आठवड्याचे अखेरीचा शिल्लक माल
(२१ फेब्रुवारी रोजींच्या रिटर्नमध्यें १२ फेब्रुवारीचा साठा दाखवावा)

(२)······ अखेरच्या आठवड्यांतील उत्पादन

(३)······ अखेरच्या आठवड्यांतील विक्री व उठाव

(४) आठवड्या अखेरची शिल्लक पेंड (१+२) उणें (३)

ता.······ ··१९४ मिलच्या व्यवस्थापकाची सही.


बेडेकर चे मसाले वापरा

दि व्हल्कन इन्शुअरन्स कं. लि.
—पुणें शाखा—
१७९, कर्वे बिल्डिंग, लक्ष्मी रोड.
आग, मोटार, अपघात व वर्कमेन्स कॉंपेन्सेशन ह्यांचे विमे स्वीकारणारी प्रमुख स्वदेशी कंपनी.
एजन्सी व इतर माहितीसाठी चौकशी करा :
ब्रँच सेक्रेटरी.

नवीन पुष्कळ निघाले, तरी
तुळजाराम मोदी,
सातारा
ह्यांचें पुढारीपण कायम आहे.




दि मोटार ओनर्स म्युच्युअल इन्शुअरन्स कं. लि. (बेळगांव)
पुणें शाखा:—९७४ सदाशिव, लक्ष्मी रोड.
मोटार मालकांनींच स्थापन केलेली, मोटारीचा विमा उतरणारी, मोटार मालकांचंच संचालक मंडळ असलेली व विमेदारांना हक्कानें शेअर्स देण्याची योजना आखणारी अखिल भारतांतील पहिलीच संस्था. प्रीमियमचे दर अत्यंत माफक व शिवाय अनेक सवलती. —एजन्सी व इतर माहितीकरितां चौकशी करा.— ब्रँच सेक्रेटरी


हें पत्र पुणें, पेट भांबुर्डा घ. नं. ९१५।१ आर्यभूषण छापखान्यांत विठ्ठल हरि बर्वे यांनीं छापिलें व श्रीपाद वामन काळे, बी. ए. यांनीं 'दुर्गानिवास,' ८२३ शिवाजीनगर (पो. आ. डेक्कन जिमखाना) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.